महाराष्ट्र टाइम्स



# Foreign Trade Policy परकीय व्यापारी धोरण ; 'एमएसएमई' उद्योजकांच्या समस्यांना प्राधान्य देण्याची मागणी

Kailas Redij | महाराष्ट्र टाइम्स.कॉम Updated: 30 Mar 2021, 09:31:00 PM

Subscribe YouTube 49K

परकीय व्यापार धोरणाचा सध्या केंद्र सरकारकडून आराखडा तयार करण्यात येत आहे. यात आयात आणि निर्यात करताना भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाय केले जाणार आहेत.देशातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांना केंद्र स्थानी ठेवून धोरण तयार करण्याची मागणी करण्यात आली आहे.



**मुंबई :** देशांतर्गत बाजारपेठेत वस्तूंच्या वाढत्या किंमती, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांना भेडसावणाऱ्या अडचणी केंद्र सरकारने आगामी परकीय व्यापारी धोरणात दूर कराव्यात, अशी मागणी वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या वरिष्ठ संचालक रुपा नाईक यांनी केली आहे.

धातूंच्या वाढत्या किमती, कच्च्या मालासाठी मोजावे लागणारे जादा पैसे आणि इंधन महागाई यासारख्या समस्यांनी देशातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांना (एमएसएमई) बेजार केले आहे. आगामी परकीय व्यापारी धोरणात या एमएसएमई उद्योजकांना केंद्रस्थानी ठेवून धोरणाची आखणी केली पाहिजे, असे मत मुंबईतील वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या वरिष्ठ संचालक रुपा नाईक यांनी व्यक्त केले.

## एप्रिलचा निम्मा महिना बँका बंद; जाणून घ्या यामागचे कारण आणि करा तुमचे नियोजन

केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाकडून येत्या १ एप्रिलपासून नवीन परकीय व्यापारी धोरणाची अमलबजावणी केली जाणार आहे. पुढील पाच वर्षांसाठी हे धोरण असेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारत अंतर्गत भारत जगाचे पुरवठादार केंद्र बनावे, यासाठी उच्च दर्जाच्या वस्तू निर्मीतीचे उद्योजकांना आवाहन केले आहे.

## बाजारात तेजीची लाट; तासाभरात गुंतवणूकदारांची जवळपास दीड लाख कोटींची कमाई

मात्र वस्तूंमधील महागाई आटोक्यात आणण्यासाठी उपपायोजना करणे आवश्यक आहे. देशाच्या एकूण निर्यातीत एमएसएमई उद्योगांचा ४८ टक्के वाटा आहे. मात्र महागाईमुळे हे उद्योजक किमान नफ्यावर काम करत आहे. महागाईमध्ये त्यांचा नफा कमी होत असल्याकडे नाईक यांनी लक्ष वेधले. करोना संकटात जागतिक बाजारपेठ ठप्प असताना देखील वरदान ठरलेल्या २३५ वस्तूंच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी परकीय व्यापारी धोरणात विशेष पावलेला उचलली पाहिजेत, अशी अपेक्षा रुपा नाईक यांनी व्यक्त केली.

## अद्याप ITR सादर केला नाही ; ३१ मार्चपूर्वी भरला नाही तर मागे लागेल चौकशीचा ससेमिरा

करोना टाळेबंदीच्या कठीण काळात निवडक २३५ वस्तूंच्या निर्यातीत मोठी वाढ झाली होती. या वस्तूंची निर्यात ३३ अब्ज डॉलरपर्यंत वाढली तर याच काळात आयातीत मात्र १४ टक्के घसरण दिसून आली. २७ अब्ज डॉलरच्या वस्तू आयात करण्यात आल्या होत्या. तर निर्यातीत ३६ टक्के वाढ झाल्याचे वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या आकडेवारीवरून दिसून आले आहे.

मागील वर्षभरात निर्यात वाढलेल्या २३५ वस्तूंमध्ये औषधे, वैद्यकीय उपकरणे आणि कृषी मालाचे एकूण निर्यातीत प्रत्येकी २२ टक्के योगदान होते. त्याखालोखाल धातू आणि रसायने यांची निर्यात झाली. त्यांचे एकूण निर्यातीत योगदान अनुक्रमे १८ टक्के आणि ११ टक्के योगदान होते.